पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती

• वर्ष १ • अंक १२५ • मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 / A2977 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

प्रत्येक यशाच्या मागे एक तात्पुरते अपयश येते आणि मन खचून जाते; पण अशाही परिस्थितीत जे झगडणे सोडत नाहीत, तेच जिंकतात.




## »थोडक्यात

### जरांगेंना एका पाठोपाठ एक झटके

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी उपोषण करुन महायुती सरकारला अनेकदा जेरीस आणणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. मनोज जरांगे यांनी गणेशोत्सपूर्वी 29 ऑगस्टला अंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले होते. ते नंतर मुंबईच्या दिशेने यायला निघाले होते. मात्र, त्यांची प्रकृती प्रचंड बिघडल्याने मनोज जरांगे यांनी 20 व्या दिवशी बीडच्या पाटोदा येथे उपोषण स्थगित केले होते. मात्र, त्यानंतर मनोज जरांगे यांचे आंदोलनातील सहकारी सातत्याने अडचणीत येताना दिसत आहेत.

---

### 'सामंत बंधूं'ची सहकारातही मोर्चेबांधणी

**रत्नागिरी :** राजकीय क्षेत्रातील प्रभावानंतर आता रत्नागिरी जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातही 'सामंत बंधूं'च्या वर्चस्वाची नवी खेळी सुरू झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीत पालकमंत्री उदय सामंत हे स्वतः शेती विकास संस्था मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. सत्ताकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त होत असून, सहकार वर्तुळात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर सामंत यांनी थेट भाष्य केले नसले, तरी आपण निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

### 'आम्ही शिवाचे भक्त, देव'; मुख्यमंत्री रेवंत रेड्डी

**नवी दिल्ली :** तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांना काँग्रेस दक्षिण भारतीय राज्यांमध्ये बऱ्यापैकी लोकप्रिय आहे, मात्र उत्तर भारतात का नाही, असा प्रश्न विचारण्यात आला. यावर त्यांनी भगवान राम आणि भगवान शिव यांचे उदाहरण दिले. तसेच त्यांनी SIR बाबतही भाष्य केले. काँग्रेसशासित तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी काँग्रेस दक्षिण भारतीय राज्यांमध्ये का लोकप्रिय आहे, हे सांगताना भगवान राम आणि भगवान शिव यांचे उदाहरण दिले.

# निवडणूक आयोगाविरोधात 4 ऑक्टोबरला मुंबईत मोर्चा!

## CJPच्या आंदोलनाला ठाकरे बंधूंचा पाठिंबा

वृत्तसंस्था २९ सप्टेंबर




**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यानी आज शिवतीर्थवर संयुक्त पत्रकार परिषद घेतली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांविरोधात ठाकरे बंधुंनी आक्रमक भूमिका घेतली आहे. 4 ऑक्टोबर रोजी शिवसेना आणि मनसेकडून संयुक्त मोर्चाची घोषणा केली. मुंबईतल्या जनमोर्चाची वेळ आणि मार्ग कसा असेल हे या पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं आहे. मतदार याद्यांमधील कथित घोळ आणि निवडणूक आयोगाच्या (ECI) कारभाराविरोधात, विशेषतः मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्रिक्षण ( प्रक्रियेच्या विरोधात ठाकरे बंधूंनी मुंबईत 4 ऑक्टोबर 2026 रोजी संयुक्त जनमोर्चा काढण्याची घोषणा केली आहे.

हा मोर्चा नेमका कोणत्या मार्गाने काढला जाणार, त्याची वेळ आणि ठिकाण काय असेल, याची सविस्तर रूपरेषा पत्रकार परिषदेत जाहीर केली आहे. राज ठाकरे यांनी मोर्चाची माहिती देताना सांगितले की, चार तारखेला संयुक्त मोर्चा निघेल. रिचर्डसन अँन्ड क्रुडास इथून मोर्चा निघून मुंबई महापालिकेसमोरच्या मंचावर याचं सभेत रुपांतर होईल. सकाळी 10 वाजताची वेळ आहे. 11 ते 11.30 पर्यंत मोर्चा निघेल. मोर्चासोबत आदित्य ठाकरे, संजय राऊत, बाळा नांदगावकर उपस्थित राहणार आहेत. पुढे ते म्हणाले की, मोर्चात काय बोलायचं आहे ते आम्ही बोलूच. निवडणूक आयोगाविरूद्धचा मोर्चा आहे. 2017-18 मध्ये मी ईव्हीएमसंदर्भात अनेक नेत्यांना भेटलो होतो. चार तारखेला याबद्दल सविस्तर बोलू. त्यामुळे इथे बोलण्याची गरज नाही. मोर्चानंतर रुपरेषा ठरवू. आम्ही सर्वच राजकीय नेत्यांना आमंत्रण देणार आहोत.

सत्ताधारी लोकांना या व्यासपीठावर यायचं असेल तर येऊ शकता. निवडणूक आयोगाच्या मागील काही वर्षातील कारभाराविरोधातील हा मोर्चा आहे. कुठल्याही राजकीय पक्षाचे झेंडे नसणार. सर्वांच्या हातात तिरंगाच असणार. संविधान वाचवण्याचा हा विषय असल्याने हातात तिरंगाच असणार, असंही राज ठाकरे यांनी स्पष्ट केलं आहे. विरोधी पक्षांमध्ये स्पर्धा दिसतेय का? यावर उत्तर देताना राज ठाकरेंनी म्हटलं की, ज्यांना जे शक्य होईल ते करावं. अजेंडा एकच आहे.तो कोणी कसाही राबवावा. हाऊसिंग सोसायटीने रस्त्यावर आंदोलन केलं तर तसंही करावं. हा काही स्पर्धेचा विषय नाही.

# ज्ञानेश कुमारांच्या अडचणीत वाढ?

## याचिकेसंदर्भात सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार

वृत्तसंस्था २९ सप्टेंबर



**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगात SIR चा कथित वाद पोहचला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयावर इतर दोन आयुक्तांनी सहमती दर्शवलेली नाही. तो मुद्दा ऐरणीवर आहे. तर मतदार याद्यांमधील विशेष पुनर्निरीक्षण प्रक्रियेला(-SIR) आव्हान देण्यात आले आहे. राकेश कुमार सिंह यांनी घटनेच्या अनुच्छेद 32 अंतर्गत ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर लवकरच सुनावणी अपेक्षित आहे.सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबीत करण्याची विनंती करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाचे अधिकार अध्यक्षांद्वारे एकतर्फी वापरता येणार नाहीत, असे स्पष्ट आदेश देण्याची विनंतीही याचिकेत करण्यात आली आहे. न्यायालयाने या याचिकेवर लवकर सुनावणी घेण्यास परवानगी दिली आहे. ज्येष्ठ विधीज्ञ विकास सिंग यांनी सरन्यायाधीशांसमोर म्हणणे मांडले. न्यायालयाने पुढील आठवड्यात सदर प्रकरण बोर्डावर घेण्याचे, सुनावणीस घेण्याची परवानगी दिली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त अधिनियम, 2023 चे कलम 18 चा आधार घेण्यात आला आहे.

याचिकेनुसार, निवडणूक आयोगाचे काम आणि कर्तव्याचे विभाजन, विकेंद्रीकरण हे जितके संभव आहे, ते होणे गरजेचे आहे. जर तीन आयुक्तांमध्ये मतभेद निर्माण झाल्यास बहुमताने निर्णय घेणे आवश्यक आहे. ऑक्टोबर 2025 ते ऑगस्ट 2026 या कालावधीत निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी कमीत कमी 14 प्रकरणात त्यांची हरकत नोंदवली, पण त्याची दखल घेण्यात आली नसल्याचे म्हणणे याचिकेत मांडण्यात आले आहे. SIR प्रक्रिया, त्यासंबंधीचा मुख्य निवडणूक आयुक्तांचा मनमानी कारभार, जुलै 2026 मध्ये फॉर्म-6 मध्ये करण्यात आलेला बदल, या अर्जात मागितलेली आजी-आजोबांची माहिती, हा अर्ज दाखल करण्यासाठी कोणताही पर्याय उपलब्ध न करून देणे. अर्जदार मतदारांना या प्रक्रियेतून बाद करण्याची कवायत याविषयी गंभीर आरोप याचिकेत करण्यात आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी त्यांच्याच स्तरावर हे प्रयोग राबवल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत जवळपास 16 लाख 10 हजार अपिलांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या मतदारांबाबत, निवडणूक आयोगाच्या नावाने ही अपिलं दाखल करण्यात आली आहेत. न्यायिक अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अपील दाखल करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. ही अपिले दाखल करण्यास कोणी अधिकृत केले हा मोठा सवालही याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

# "गुटख्याची जाहिरात करताय, तर आधी स्वत:च्या मुलांना खायला द्या"

## तुकाराम मुंढेंची कलाकारांवर टीका

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**मुंबई:** महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनाने नुकतीच गुटखा आणि पान मसाल्याच्या जाहिरात केल्याप्रकरणी शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती, या नोटिशीतून त्यांना अशा जाहिराती न करण्याचे आणि त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांवरून या जाहिरातीशी संबंधित प्रचारात्मक सामग्री हटवण्याचे निर्देश देण्यात आले होते. एनडीटीव्हीने आयोजित केलेल्या 'युवा' कार्यक्रमात अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या कारवाईबद्दल सविस्तर माहिती दिली. गुटख्याच्या जाहिरातीवरून केलेल्या कारवाईबाबत त्यांना विचारण्यात आलं तेव्हा मुंढे म्हणाले, "विचार अगदी साधा आहे. हे पुन्हा एकदा व्यवस्थेचा भाग असण्याचं सातत्य आहे", असं ते म्हणाले.

त्यानंतर मुंढे यांनी त्यांना तीव्र नापसंत असलेल्या गोष्टीबद्दल म्हणजेच लाळघोटेपणा आणि दुटप्पी भूमिकेबद्दल भाष्य केलं. "मला कोणाचीही चमचेगिरी करायला आवडत नाही. मला लाळघोटेपणाचा तिरस्कार आहे. दुटप्पीपणा, दुहेरी आणि अनेक चेहरे असणं मला आवडत नाही", असं ते म्हणाले. त्यांनी असा युक्तिवाद केला की लोकांचे वैयक्तिक जीवनात एक आणि व्यावसायिक जीवनात दुसरे, असे वेगवेगळे निकष असू शकत नाहीत. जर कोणी जाहीरपणे इतरांना सांगत असेल की एखादे उत्पादन चांगले आहे, तर तोच नियम ते उत्पादन प्रमोट करणाऱ्या व्यक्तीलाही लागू झाला पाहिजे.

पान आणि गुटखा जाहिरातींचा थेट संदर्भ देत ते पुढे म्हणाले, "जर तुम्ही पान किंवा गुटख्याची जाहिरात करत असाल, तर आधी तुम्ही स्वतः त्याचं सेवन केलं पाहिजे. तुमच्या मुलांना त्याचं सेवन करू द्या आणि त्यांना त्याची सवय लावू द्या. मग इतरांना ते करायला सांगा. याच्या उलट का असावे?" कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करणं म्हणजे केवळ त्या उत्पादनाला आपला चेहरा देणं नव्हे, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

# वाहतूक नियम मोडलात तर थेट वीज बिलातच येणार दंडाची रक्कम

## सर्वोच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

वृत्तसंस्था २९ सप्टेंबर



**नवी दिल्ली :** वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी सरकारने एक नाविन्यपूर्ण पद्धत अवलंबावी, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केली. वाहतूक नियमांचा भंग करून दंड न भरणाऱ्या वाहनचालकांच्या दंडाची रक्कम आता थेट त्यांच्या वीज बिलात समाविष्ट करण्यात यावी, जेणेकरून वीज कापली जाण्याच्या भीतीपोटी दंड भरतील, असे न्यायालयाने सुचवले. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने असेही सुचवले की, ज्या वाहनांवरील दंड अद्याप भरलेला नाही, अशा वाहनांना काळ्या यादीत टाकावे आणि त्यांच्या वाहन मालकी हस्तांतरणावर तात्काळ बंदी घालावी, असे निर्देशही प्रशासनाला दिले आहेत. खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, केवळ ई-चलन जारी करून पोलीस मोकळे होत आहेत, परंतु दंडाची प्रभावी वसुली हा सध्याचा सर्वात मोठा प्रश्न आहे. जोपर्यंत लोक स्वतःहून वाहतूक दंडाची रक्कम भरत नाहीत, तोपर्यंत ती त्यांच्या वीज बिलात समाविष्ट करावी. वीज बिल भरले नाही तर वीज कापली जाईल, या भीतीमुळे लोक वेळेवर दंड भरतील. देशात अशा प्रकारची कठोर यंत्रणा उभी करणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने म्हटले. सुनावणीदरम्यान न्यायालयाला माहिती देण्यात आली की, देशभरात आतापर्यंत एकूण ४५ हजार कोटी रुपयांचे ई-चलन जारी करण्यात आले आहेत, त्यापैकी केवळ २५ हजार कोटी रुपयांचीच वसुली झाली असून उर्वरित मोठा निधी अजूनही थकीत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा उत्तर प्रदेशात सरकारला दणका

वृत्तसंस्था २९ सप्टेंबर



**नवी दिल्ली :** संभल हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी मुल्ला अफरोजला सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय सुरक्षा कायदा NSA १९८० च्या अंतर्गत प्रिव्हेंटिव आणि डिटेंशन रद्द केलं आहे. अफरोजला हा दिलासा दिलेला असतानाच सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला १० लाख रूपये दंड भरा असे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने मुल्ला अफरोजबाबत अलाहाबाद हायकोर्टाने तो निर्णय रद्द केला ज्यात अफरोजला ताब्यात ठेवण्याचा आदेश कायम ठेवला होता. जस्टिस दीपांकर दत्ता आणि जस्टिस शील नागू यांच्या पीठाने सुनावणी घेत हा निर्णय दिला आहे. उत्तर प्रदेश सरकार फक्त पोलिसांच्या ताब्यात असलेल्या एका आरोपीच्या कबुलीचा आधार घेऊन त्याला ताब्यात घेण्याचा आदेश मंजूर करू शकत नाही असंही या पीठाने म्हटलं आहे. मुल्ला अफरोजवर २०२४ मध्ये संभल शाही मशिदीबाबत न्यायालयाने सर्व्हेनंतर जो आदेश दिला होता त्या प्रकरणी हिंसा पसरवल्याचा आऱोप आहे. या हिंसाचारात चार लोकांचा मृत्यू झाला होता. अफरोजला घटना घडल्यानंतर ५४ दिवसांनी अटक केली. या प्रकरणात असा आरोप आहे की एका कथित प्रतिज्ञापत्रावर त्याला अटक करण्यात आली. अलहाबाद उच्च न्यायालयाने नंतर अफरोजला जामीन मंजूर केला होता. तरीही १३ ऑक्टोबर २०२५ ला NSA तहत त्याला ताब्यात घेण्याचा आदेश दिला गेला आहे. अलहाबाद उच्च न्यायालयात हे प्रकरण गेलं तेव्हा त्या न्यायालयाने त्याला ताब्यात ठेवण्याचा आदेश कायम ठेवला.

# नऊ टक्के विद्यार्थ्यांत आत्महत्येचे विचार

## सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या टास्क फोर्सचे सर्वेक्षण

प्रतिनिधी २९ सप्टेंबर



**मुंबई:** आयआयटी मुंबईत साहिल वाकोडे या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येमुळे विविध प्रश्न उपस्थित केले जात असताना देशातून एक धक्कादायक सर्वेक्षण समोर आले आहे. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत १५ टक्के विद्यार्थी तणावाखाली असल्याचे आढळून आले. धक्कादायक बाब म्हणजे नऊ टक्के विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येचे विचार आल्याचे देशभरात केलेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या टास्क फोर्सने देशभरात केलेल्या सर्वेक्षणातून ही माहिती समोर आली आहे. यासंबधीत पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, देशातील उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मानसिक समस्यांची माहिती टास्क फोर्सकडून गोळा करण्यात आलीय. विद्यार्थी आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्नाचा भाग म्हणून सर्वेक्षण करण्यात आले. टास्क फोर्सचा अहवाल ३१ ऑक्टोबर रोजी सादर केला जाण्याची शक्यता आहे. आयआयटी मुंबईत साहिल वाकोडे यांच्या आत्महत्येनंतर विविध प्रश्न उपस्थित केले जात असून, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

सर्वोच्च न्यायलयाने नियुक्त केलेल्या पथकाने या वर्षाच्या सुरुवातीला अंतरिम अहवाल सादर केला होता. यामध्ये उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी अनुभवत असलेल्या विविध समस्यांचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये सामाजिक भेदभाव, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात होणारा लैंगिक छळ, विधी आणि वैद्यकीय विद्यापीठातील स्त्री- पुरुष भेदभाव, शैक्षणिक सहकार्य, हॉस्टेल कर्फ्यु आणि मोरल पोलिसिंग यांचा समावेश करण्यात आला होता. तसेच, नीट आणि जेईई परीक्षांमधील जात वैधता, प्रवेशावेळी जात आधारीत होणारा भेदभाव, ग्रेडिंग, भाषा आणि फॅक्लटीचे लक्ष या गोष्टीही समोर आल्या होत्या. टास्क फोर्सने देशभरात केलेल्या सर्वेक्षणात २.४३ लाख विद्यार्थ्यांची मतं जाणून घेतली. यापैकी ६७ टक्के विद्यार्थी एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील होते पैकी ३४ टक्के विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये बाहेरुन आल्यासारखी भावना जाणवत होती. १५ टक्के विद्यार्थ्यांनी गेल्या सहा महिने तणावपूर्ण असल्याचे सांगितले. नऊ टक्के विद्यार्थ्यांनी आत्महत्येचे विचार मनात आल्याचे सांगितले. ५६ टक्के विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन गंभीर विषय व्यवस्थितपणे हताळत असल्याचे नमूद केले तर, ३२ टक्के विद्यार्थ्यांनी संस्थेत समुपदेशन सुविधा नसल्याचे सांगितले. या सर्वेक्षणात रोजगाराशी निगडीत चिंताही विद्यार्थ्यांना भेडसावत असल्याचे समोर आले. या सर्वेक्षनानंतर शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना मदत आणि आवश्यक सहकार्य मिळावे यासाठी सुविधा उभारण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

# सुधीर राऊतांनी सांगितली दादांसोबतची शेवटची भेट

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**मुंबई:** अजित पवारांचा तो शेवटचा विमान प्रवास आणि देवगिरी बंगल्यापासून ते विमानतळाच्या गेट नंबर ८ पर्यंतचा तो शेवटचा १ तास.. ज्या माणसासोबत तासाभरापूर्वी संवाद झाला, तेच अजितदादा अचानक आपल्याला सोडून गेले यावर आजही विश्वास बसत नाहीये...पण, त्या अखेरच्या प्रवासात अजितदादांच्या (Ajit Pawar) मनात नेमकं काय चाललं होतं? दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या का? राष्ट्रवादी कृषी पदवीधर संघटनेचे अध्यक्ष सुधीर राऊत हे अजित पवारांच्या त्या शेवटच्या गाडी प्रवासात त्यांच्यासोबत असणारे एकमेव साक्षीदार होते. त्या प्रवासादरम्यान अजितदादांनी दिलेला तो मोठा शब्द आणि अपघाताच्या बातमीने बसलेला धक्का... काय घडलं होतं त्या १ तासात? याबाबत सुधीर राऊत सविस्तरपणे सांगितलं आहे.

बोलताना सुधीर राऊत म्हणाले, अजित पवारांचा विमान अपघात झाला. तत्पूर्वी देवगिरी ते एयरपोर्ट प्रवासात मी एकमेव व्यक्ती त्यांच्यासोबत होतो. सकाळी ७ वाजता देवगिरीला त्यांनी बोलवलं होतं. त्यांना बारामतीला लवकर जायचं होतं म्हणून मला सोबत विमानतळापर्यंत घेऊन गेले.

प्रवासात मला त्यांनी १२ तारखेला आपण दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करत आहोत असं स्पष्टपणे सांगितलं. साहेब आपल्यासाठी विठ्ठल आहेत, त्यामुळे आपण त्यांची माफी मागायची. झालं गेलं सोडून द्यायच आणि त्यांच्या नेतृत्वात ते सांगतील तसं काम करायचं असं त्यांनी मला सांगितलं. मी एयरपोर्टला गेट नंबर ८ पर्यंत सोबत गेलो आणि तिथून शरद पवारांना भेटायला पुन्हा माघारी सिल्वर ओकला आलो. माघारी आल्यानंतर सिल्वर ओक जवळ थांबलो होतो, त्यावेळी अजित पवारांच्या अपघाताची बातमी कळाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २

मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# दुष्काळाशी सामना करताना..!



डॉ. संजय खडक्कार
मो. 7276614260

यंदा राज्यात सामान्य पर्जन्यमानाच्या तुलनेत सुमारे १७ टक्के पाऊस कमी झाला आहे. मराठवाड्यात अंदाजे ३५ टक्के तूट नोंदवली गेली व विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर यांसारख्या जिल्ह्यांमध्ये ३० टक्क्यांहून अधिक पावसाची तूट झाली आहे. राज्यात ३५८ तालुके असून त्यापैकी २६५ तालुक्यांत (सुमारे ७५ टक्के भागात) महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केला.

वातावरणातील बदल व जागतिक तापमान हळूहळू पण सतत होणारी वाढ बघता भविष्यात पाऊस नेहमीच कमी होईल असे नाहीतर तो 'कधी अतिवृष्टी तर कधी कडक ऊन' अशा लहरी स्वरूपाचा होईल. याआधी पावसाळ्यातील चार महिन्यात पाऊस विभागून पडायचा पण आता तो मोजक्या दिवसात ढगफुटी सारखा पडताना दिसतो. तीस दिवसाचा पाऊस अवघ्या तीन ते चार दिवसात पडून जाताना दिसतो. त्यामुळे या संभाव्य बदलाला कसे सामोरे जायचे याबाबत गांभीयनि विचार करण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्र हे एक प्रमुख कृषी प्रधान राज्य आहे, जिथे शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. राज्यातील सुमारे ५० टक्क्यांपेक्षा जास्त कार्यशील लोकसंख्या शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. यामुळे पुढील काळात हवामान बदलानुसार शेतीत बदल करणे गरजेचे आहे. कमी पाण्याच्या पिकाकडे जसे तूर, मूग, गळीत धान्ये (तेलबिया) यासारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचे क्षेत्र जाणीवपूर्वक वाढवावे लागेल.

ठिबक सिंचन सक्तीने करणे, विहिरी किंवा धरणाच्या पाण्यातून थेट पाणी देण्याऐवजी सूक्ष्म सिंचनाचा (तुषार आणि ठिबक) वापर वाढवावा लागेल, ज्यामुळे ६० टक्के पाण्याची बचत करणे शक्य होईल. भविष्यात दुष्काळात पाण्याची कमतरता टाळण्यासाठी पावसाचे

पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्रात ८० टक्क्यांच्यावर जमीन कडक बेसॉल्ट खडकाची असल्याने त्यात पाणी लवकर मुरत नाही. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून न जातात जमिनीत जिरवण्यासाठी समपातळी चर, गॅबियन बंधारे (लोखंडी जाळीच्या सांगाड्यात किंवा पिंजऱ्यात मोठे, अनघड दगड भरून नाल्यामध्ये किंवा ओहोळावर तयार केला जाणारा एक अर्धपारगम्य बंधारा) आणि मातीचे नाला बांध बांधणे इत्यादी उपाय करणे आवश्यक ठरेल. पावसाच्या अनिश्चिततेवर मात करण्यासाठी आणि पिकांना संरक्षित सिंचन देण्यासाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना जिथे व्यवहार्य तेथे अधिक सवलती देऊन लागू करण्यात आली पाहिजे, जेणेकरून पावसाला उशीर झाल्यास शेततळ्यातील पाणी पिकांना वापरता येईल. पेरणी करताना 'रुंद वाफा सरी' बीबीएफ (ब्रॉड बेड फरो) या पद्धतीचा वापर केल्यास, अतिवृष्टीमध्ये अधिकचे पाणी सरीतून वाहून जाईल आणि दुष्काळ पडल्यास सरीमध्ये ओलावा टिकून राहील. एकाच वेळी शेतात एकापेक्षा जास्त पिके घेतल्याने एक पीक वाया गेले तरी दुसऱ्या पिकातून उत्पन्न मिळते. भविष्यातील संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीत कोणते मिश्र पिके घ्यावीत याचे योग्य मार्गदर्शन कृषी विद्यापीठांनी देणे गरजेचे ठरेल. सेंद्रिय खतांचा वापर केल्याने जमिनीत पाणी धरून राहण्याची क्षमता वाढते. दुष्काळात आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी शेतीपूरक व्यवसाय जसे दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन यासारख्या जोड धंद्यांना प्रोत्साहन द्यावे लागेल. वॉटर हार्वेस्टिंग म्हणजेच छतावरील पावसाचे पाणी साठवणे आणि ते जमिनीत जिरवणे, हे आता प्रत्येक घरासाठी अत्यंत गरजेचे झाले आहे. शहरी भागातील प्रत्येक नवीन आणि जुन्या इमारतीवर छतावरील पाणी जमिनीत जिवणे कायदेशीर सक्तीने करून त्याची कडक अंमलबजावणी करावी लागेल. नवीन घर बांधताना केवळ कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष जागेवर वॉटर हार्वेस्टिंग झाल्याचे खात्री करूनच स्थानिक स्वराज्य संस्थेने भोगवटा पत्र द्यावे.

लोकवस्तीत प्रामुख्याने शहरी भागात व्यावसायिक इमारती, हॉटेल्स सोसायटीमध्ये, वॉटर ऑडिट करून पाण्याचा वापर मोजल्या जावा. शहरातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी बगीचे, बांधकाम आणि उद्योगासाठी वापरणे बंधनकारक करणे ही आता निकडीचे झाले

आहे. सांडपाण्याचे शुद्धीकरण करून ते शेतीसाठी किंवा उद्योगासाठी वापरायला पाहिजे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात उपलब्ध असलेल्या पाणी साठ्यावरून 'पाणी बजेट' तयार केले पाहिजे, व त्यानुसार पाण्याचा वापर निश्चित केला गेला पाहिजे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता युगात 'स्मार्ट' तंत्रज्ञान आणि डेटाचा उपयोग करून शाश्वत जल व्यवस्थापन करणे शक्य आहे. आयओटी आधारित सेन्सर्स, एआय-आधारित गळती शोधन आणि सॅटेलाइट मॅपिंगमुळे रिअल टाइम जल-अंदाजपत्रक तयार करणे शक्य होते आणि जुन्या शहरी पाईप लाईन मधील गळतीची प्रमुख ठिकाणे ओळखण्यास मदत होऊ शकते.

जीआयएस-आधारित रिमोट सेन्सिंग यांसारख्या साधनांचा उपयोग पाणीटंचाई असलेल्या प्रदेशांचे मॅपिंग करण्यासाठी केले जाऊ शकते, ज्यामुळे सरसकट उपाययोजना लागू न करतापुराव्यांवर आधारित उपाययोजना करणे शक्य होईल. झाडे मोठ्या जलपंपांप्रमाणे काम करतात. ती पृथ्वीतून ओलावा शोषून घेतात आणि बाष्पोत्सर्जनाव्दारे तो आकाशात सोडतात, ज्यामुळे आकाशात वाफेचे प्रमाण वाढून ढग निर्मिती होते. तसेच दाट जंगल छत्रामुळे स्थानिक पातळीवर कमी दाबाचे पट्टे तयार होतात, जे महासागर व मोठ्या जलाशयामधून दमट हवेचे प्रवाह सक्रियपणे खेचून घेतात. त्यामुळे पाऊस आकर्षित करण्यासाठी स्थानिक प्रजातींचा जसे कडुलिंब, वड, पिंपळ, चिंच इत्यादी वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड करणे ही काळाची गरज आहे.

जेथे शक्यता असेल तेथे जलस्रोत निर्माण करणे किंवा उपलब्ध जलस्रोत पुनर्जीवित करणे आवश्यक आहे. शहरातील/गावातील जुने तलाव, मामा तलाव व धरणातील गाळ लोकसहभागाने उपसल्यामुळे पाण्याची साठवण क्षमता वाढू शकते. पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि त्याचा अपव्यय टाळणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. पाणी ही मर्यादित नैसर्गिक संपत्ती आहे, त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वैयक्तिक पातळीवर जाणीवपूर्वक पाण्याची बचत करणे आवश्यक आहे. पाणी बचतीचे संस्कार शाळेतून, घरोघरातून रुजवणे हे अत्यावश्यक आहे. काळानुरूप, पाण्याचा प्रत्येक थेंब हा मोलाचा आहे ही मानसिकता प्रत्येक नागरिकांनी अंगीकारणे आवश्यक आहे. एकंदरीत, लोकसहभाग आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीतून भविष्यात दुष्काळाला खंबीरपणे सामोरे जाणे शक्य होईल.

# संस्कारांची पेरणी: काळाची गरज!

सौ. नेहा जंगले
जळगाव

"मुलांना काय द्यावे?" या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपण अनेकदा उत्तम शिक्षण, चांगल्या सुविधा, दर्जेदार पुस्तके आणि उज्ज्वल करिअर यांचा विचार करतो. परंतु या सर्वांपेक्षा मौल्यवान अशी एक गोष्ट आहे—संस्कार आणि मूल्ये.

ज्ञान माणसाला सक्षम बनवते; परंतु त्या ज्ञानाचा योग्य उपयोग करण्याची दिशा मूल्ये आणि संस्कार देतात. म्हणूनच शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ परीक्षेत चांगले गुण मिळवणे नसून एक संवेदनशील, जबाबदार, प्रामाणिक आणि सुजाण माणूस घडवणे हे असले पाहिजे.

आजचे युग विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीच्या वेगवान प्रगतीचे आहे. मुलांच्या हातात मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील ज्ञान सहज उपलब्ध आहे. मात्र, या ज्ञानासोबत विवेक, संयम, संवेदनशीलता, सहकार्य आणि माणुसकीची जोड मिळणे तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच मूल्यशिक्षण ही आजच्या काळाची गरज नसून भविष्यातील समाजाची पायाभरणी आहे.

## मूल्यशिक्षण : शिक्षणाचा आत्मा

शिक्षण म्हणजे केवळ अक्षर ओळखणे, गणित सोडवणे किंवा पाठ्यपुस्तकातील प्रश्नांची उत्तरे देणे नव्हे. शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनात सत्य, प्रामाणिकपणा, शिस्त, समता, सहकार्य, आदर, जबाबदारी, दया आणि बंधुभाव यांसारखी जीवनमूल्ये रुजली पाहिजेत. भारतीय संस्कृतीमध्ये मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. "सत्यं वद, धर्मं चर" पासून "वसुधैव कुटुंबकम्" पर्यंत आपल्या संस्कृतीने सदैव चांगल्या विचारांची आणि उत्तम आचरणाची शिकवण दिली आहे.आजच्या पिढीला ही मूल्ये केवळ सांगून चालणार नाहीत; ती जगण्याची आणि अनुभवण्याची संधी विद्यार्थ्यांना द्यावी लागेल.

## 'मूल्यवर्धन' : मूल्यांची प्रत्यक्ष अनुभूती

शांतीलाल मुथा फाउंडेशन (SMF) आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा 'मूल्यवर्धन' उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. मूल्यवर्धन हा केवळ अभ्यासक्रमातील आणखी एक विषय नाही. तो विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारा, भावनांना समृद्ध करणारा आणि कृतीला सकारात्मक वळण देणारा जीवनानुभव आहे.

वर्गातील विविध उपक्रम, गटकार्य, चर्चा, खेळ, प्रार्थना, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सहकार्य आणि दैनंदिन शालेय व्यवहार यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूल्यांचा अनुभव घेता येतो. मूल्य सांगण्यापेक्षा ते जगून दाखवणे आणि कृतीतून अनुभवणे ही मूल्यवर्धनाची खरी ताकद आहे.

## छोट्या कृतीतून मोठे संस्कार

एखाद्या मित्राला अडचणीच्या वेळी मदत करणे, वर्ग स्वच्छ ठेवणे, पाण्याची नासाडी टाळणे, झाडांची काळजी घेणे, रांगेत शिस्त पाळणे, आपली चूक प्रामाणिकपणे मान्य करणे, इतरांचे बोलणे शांतपणे ऐकणे किंवा गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे—या साध्या कृती आहेत; परंतु याच कृतींमधून मोठी जीवनमूल्ये रुजतात. विद्यार्थ्यांनी "हे माझे काम नाही" असे न म्हणता "मी यासाठी काय करू शकतो?" असा विचार करणे हीच मूल्यशिक्षणाची खरी फलश्रुती आहे.

## शिक्षक : संस्कारांचा दीपस्तंभ

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षक केवळ विषय शिकवत नाहीत, तर ते विद्यार्थ्यांसमोर आदर्श आचरणाचे उदाहरण ठेवतात. शिक्षक वेळेचे पालन करतात, सर्व विद्यार्थ्यांशी समानतेने वागतात, प्रत्येकाच्या मताचा आदर करतात, स्वतःची चूक मान्य करतात आणि जबाबदारीने काम करतात—तेव्हा विद्यार्थी हे सर्व नकळत आत्मसात करतात. म्हणूनच, "मूल्ये शिकवण्यापेक्षा मूल्ये जगून दाखवणे अधिक प्रभावी असते." ही भावना प्रत्येक शिक्षकाने आपल्या कार्यात जपली पाहिजे.

## घर : संस्कारांची पहिली शाळा

मूल्यशिक्षणाची सुरुवात शाळेत होण्यापूर्वीच घरातून होते. आई-वडील हे मुलांचे पहिले शिक्षक असतात. घरातील संवाद, वडीलधाऱ्यांचा आदर, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती, प्रामाणिकपणा, साधेपणा आणि शिस्त यांचा मुलांच्या मनावर खोल परिणाम होतो. पालकांनी मुलांना केवळ "किती गुण मिळाले?" असे न विचारता, "आज तू कोणाला मदत केलीस?" "आज तुला काय नवीन शिकायला मिळाले?" "तुझ्याकडून काही चूक झाली का? ती तू कशी सुधारशील?"

## असे प्रश्नही विचारले पाहिजेत.

कारण गुणपत्रिका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मोजमाप करते; पण संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देतात.

## शाळा, पालक आणि समाज : एकत्रित प्रयत्न

संस्कारक्षम पिढी घडविण्याची जबाबदारी केवळ शिक्षकांची नाही. शाळा, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे.शाळा विद्यार्थ्यांना योग्य दिशा देते, पालक त्या मूल्यांना घरात बळकटी देतात आणि समाज त्यांना प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणण्याची संधी देतो. या सर्वांच्या समन्वयातूनच सुजाण, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडू शकतात.

## पर्यावरणप्रेम : भावी पिढीचा संस्कार

आज पर्यावरणाचे संवर्धन ही केवळ सामाजिक गरज नाही, तर प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी झाडे लावणे, पाणी वाचवणे, परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक करणे यांसारख्या कृती केल्या, तर त्यातून पर्यावरणप्रेमाचा संस्कार रुजतो. "निसर्ग माझा आहे आणि त्याची काळजी घेणे ही माझी जबाबदारी आहे" हा विचार बालमनात रुजवणे म्हणजे भावी पिढीला सुरक्षित भविष्याची भेट देणे होय.

## माणुसकी : सर्व मूल्यांचा केंद्रबिंदू

सर्व मूल्यांच्या केंद्रस्थानी एक मूल्य आहे—माणुसकी. विद्यार्थी कितीही हुशार असला, कितीही मोठ्या पदावर पोहोचला, तरी त्याच्या मनात दुसऱ्यांच्या दुःखाची जाणीव नसेल, तर त्याचे शिक्षण अपूर्ण आहे. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य आणणे, दुःखात आधार देणे, गरजूंना मदत करणे, प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करणे आणि कोणाशीही भेदभाव न करणे—हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे. चांगले गुण मिळवणारा विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो; पण चांगली मूल्ये जपणारा विद्यार्थी समाज घडवतो.

## उद्याचा भारत आजच्या बालमनात

आजच्या वर्गात बसलेली मुलेच उद्याचे शिक्षक, डॉक्टर, अभियंते, अधिकारी, उद्योजक, शास्त्रज्ञ, कलाकार आणि समाजाचे नेतृत्व करणारे नागरिक असतील. त्यांच्या हातात उद्याचा देश असेल. म्हणून त्यांच्या मनात आजच प्रामाणिकपणा, समता, बंधुभाव, सहकार्य, पर्यावरणप्रेम, संवेदनशीलता आणि देशाप्रती जबाबदारी यांची बीजे पेरणे आवश्यक आहे.

आज आपण त्यांच्या मनात जे पेरू, तेच उद्या समाजात उगवेल. म्हणूनच—

**संस्कारांची पेरणी आज करूया,मूल्यांची मुळे घट्ट रुजवूया;माणुसकीची फुले फुलवूया,आणि उज्ज्वल भविष्याची निर्मिती करूया!**

## समारोप

शिक्षणाच्या प्रवासात गुण महत्त्वाचे आहेत; परंतु गुणांपेक्षा गुणवैशिष्ट्ये अधिक महत्त्वाची आहेत. ज्ञान आवश्यक आहे; परंतु ज्ञानाला विवेकाची जोड हवी. यश आवश्यक आहे; परंतु यशासोबत माणुसकीही हवी चला, आपण प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात केवळ गुणांची गुणपत्रिका न देता मूल्यांची शिदोरी देऊया. त्यांच्या डोळ्यांत स्वप्ने, मनात संवेदना, विचारांत विवेक आणि कृतीत माणुसकी निर्माण करूया. कारण— «"ज्ञान माणसाला हुशार बनवते, संस्कार त्याला सज्जन बनवतात, आणि माणुसकी त्याला खऱ्या अर्थाने माणूस बनवते."» हीच मूल्यवर्धनाची खरी दिशा आणि शिक्षणाची खरी सार्थकता आहे. संस्कारांची पेरणी करूया... उज्ज्वल भविष्याची निर्मिती करूया!

# दीनदयाल प्रबोधिनी: ग्रामविकास, शेतकरी स्वावलंबन आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास

यवतमाळ जिल्ह्यातील निळोणा येथील दीनदयाल प्रबोधिनी ही ग्रामीण, आदिवासी आणि शेतकरी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांत सातत्याने कार्य करणारी संस्था म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करीत आहे. शिक्षण, आरोग्य, कृषी विकास, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, पारंपरिक बियाण्यांचे जतन आणि ग्रामीण विकास अशा अनेक अंगांनी संस्थेचे कार्य विस्तारले आहे संस्थेच्या कार्याचा केंद्रबिंदू केवळ आर्थिक मदत नसून समाजातील शेवटच्या घटकाला शिक्षण, कौशल्य, रोजगार, स्वावलंबन आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळवून देणे हा आहे.

## विवेकानंद छात्रावास : विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार

दीनदयाल प्रबोधिनीमार्फत विवेकानंद छात्रावास सुरू असून त्यामध्ये एकूण ४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये १४ विद्यार्थी पारधी समाजातील खेड्यांमधून, तर ३० विद्यार्थी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांमधील आहेत.

ग्रामीण व वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक वातावरण, निवास आणि मार्गदर्शन मिळावे, त्यांना आपल्या परिस्थितीवर मात करून पुढे जाण्याची संधी मिळावी, हा छात्रावासामागील महत्त्वाचा उद्देश आहे.

या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच आत्मविश्वास, संस्कार आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करण्याचे कार्यही महत्त्वाचे आहे.

## शाश्वत कृषी विकास प्रकल्प : २८५ गावांतील ११,३८६ शेतकरी

शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे दीनदयाल प्रबोधिनीने शेतकऱ्यांच्या त्पन्नवाढीसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पात २८५ गावांमधील ११,३८६ शेतकरी सहभागी झाले असून त्यांनी एकूण २५,३९९ एकर क्षेत्रामध्ये विविध कृषी उपक्रम राबविले आहेत. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नात वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. कमी खर्चाची, शाश्वत आणि विषमुक्त नैसर्गिक शेती, स्थानिक साधनसामग्रीचा वापर, जमिनीचे आरोग्य जपणे आणि उत्पादन खर्च कमी करणे या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते.

## तीन कृषी विकास उपकेंद्रांचा विस्तार

दीनदयाल प्रबोधिनीच्या कार्यक्षेत्रात कृषी विकासासाठी तीन उपकेंद्रे कार्यरत आहेत—

१. वत्सगुल्म कृषी विकास प्रकल्प, तोरणाळा, वाशिमया प्रकल्पाशी १,२९९ शेतकरी संलग्न आहेत.

२. समृद्धी कृषी विकास प्रकल्प, पिंपरी कलगा, तालुका नेर, जिल्हा यवतमाळ या प्रकल्पाशी १,८०० शेतकरी संलग्न आहेत.

३. माहुरगड कृषी विकास प्रकल्प, धनोडा, तालुका महागाव, जिल्हा यवतमाळ या प्रकल्पाशी १,५४२ शेतकरी संलग्न आहेत. या प्रकल्पांमधून स्थानिक परिस्थितीला अनुरूप शेती पद्धती, नैसर्गिक शेती, शाश्वत कृषी तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर दिला जात आहे.

## ग्रामीण महिलांच्या माध्यमातून ९,००० किचन गार्डन

दीनदयाल प्रबोधिनीने ग्रामीण महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून यवतमाळ जिल्ह्यातील १२ तालुक्यांमधील ४१३ गावांत तब्बल ९,००० किचन गार्डन विकसित केली आहेत. घराच्या परिसरात भाजीपाला पिकविण्याच्या माध्यमातून महिलांना



विषमुक्त, ताजा आणि पौष्टिक भाजीपाला उपलब्ध करून देण्याबरोबरच कुटुंबाच्या खर्चात बचत आणि महिलांच्या सहभागातून स्वावलंबनाची दिशा देण्यात येत आहे.

## स्थानिक बियाण्यांचे संवर्धन

स्थानिक व पारंपरिक भाजीपाला बियाण्यांचे संवर्धन, संकलन आणि वितरण करण्यासाठी १०० संकलन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे.

स्थानिक बियाणे ही आपल्या कृषी संस्कृतीची आणि जैवविविधतेची अमूल्य संपत्ती आहे. त्यांचे जतन केल्यामुळे पारंपरिक वाण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होते आणि शेतकरी व ग्रामीण कुटुंबांचा बाहेरील बियाण्यांवरील अवलंबित्व कमी करण्यास हातभार लागतो.

## ७१ महिलांनी तयार केले ११,५०० बियाणे किट्स

महिला सक्षमीकरणाचा आणखी एक उल्लेखनीय उपक्रम म्हणजे ७१ ग्रामीण महिलांनी किचन गार्डन प्रकल्पासाठी ११,५०० बियाणे किट्स तयार केली आहेत.या कामातून महिलांना केवळ प्रशिक्षणच मिळाले नाही, तर त्यांच्या कौशल्याला रोजगाराची जोड मिळाली. त्यामुळे महिला उत्पादक, प्रशिक्षक आणि स्वावलंबी घटक म्हणून पुढे येत आहेत.

## पर्यावरण संवर्धनासाठी ६२,१०९ सीड बॉल्स

पर्यावरणाचे संवर्धन आणि गावांचे हरितीकरण करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून ६२,१०९ सीड बॉल्स तयार करण्यात आले आहेत. गाव परिसरात वृक्षसंवर्धन आणि हिरवाई वाढविण्याच्या या उपक्रमामुळे पर्यावरणाबाबत ग्रामीण समाजात जागरूकता निर्माण होत आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी निसर्गसंपदा जतन करण्याचा हा प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या माध्यमातून परसबाग दीनदयाल प्रबोधिनीने २०० हून अधिक ग्रामीण शाळांना विद्यार्थ्यांच्या माध्यमातून परसबाग निर्मितीसाठी सहाय्य केले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता शेती, पर्यावरण, पोषण आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून समजावे, हा या उपक्रमामागील विचार आहे. शाळेतील परसबाग म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक प्रकारची जिवंत प्रयोगशाळाच आहे. त्यातून पर्यावरण संवर्धन, पौष्टिक आहार आणि शेतीविषयी प्रेम निर्माण होण्यास मदत होते.

## ग्रामीण महिलांना रोजगाराची संधी

महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून श्री वेद फाउंडेशनसाठी ४,००० कापडी पिशव्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या कामामुळे ग्रामीण महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. महिलांच्या हाताला काम, कुटुंबाला आर्थिक आधार आणि प्लास्टिकला पर्याय अशा तीनही उद्देशांना या उपक्रमातून चालना मिळते. त्यामुळे महिला सक्षमीकरणाबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागतो.

## गोधनी ग्रामविकास प्रकल्प : सन्मानपूर्वक जीवनाची दिशा

दीनदयाल प्रबोधिनीच्या माध्यमातून गोधनी ग्रामविकास प्रकल्पातही महत्त्वपूर्ण काम करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ७० घरांसाठी स्नानगृहांची उभारणी करण्यात आली. स्वच्छता, आरोग्य आणि महिलांच्या सन्मानाशी निगडित असलेल्या अशा मूलभूत सुविधांची उपलब्धता ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ७० महिलांना रक्षाबंधनाची अनोखी भेट देण्यात आली. ही भेट केवळ वस्तुरूपाने नव्हे, तर ग्रामीण महिलांच्या सन्मानाची, सुरक्षिततेची आणि सामाजिक बांधिलकीची भावना व्यक्त करणारी ठरली.

## शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांसाठी संवेदनशील प्रयत्न

शेतकरी आत्महत्येमुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांमध्ये सर्वाधिक परिणाम महिला आणि मुलांवर होतो. अशा कुटुंबांना केवळ मदत देण्यापेक्षा त्यांना स्वावलंबी आणि आत्मविश्वासपूर्ण बनविणे ही खरी गरज आहे. दीनदयाल प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांमधून अशा कुटुंबातील महिलांना प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी, किचन गार्डन आणि कौशल्याधारित कामाशी जोडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांसाठी विवेकानंद छात्रावासाच्या माध्यमातून शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हाही याच सामाजिक बांधिलकीचा भाग आहे.

## 'मदत' नव्हे, तर 'स्वावलंबन' हा केंद्रबिंदू

दीनदयाल प्रबोधिनीच्या कार्याकडे पाहिले असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—संस्था केवळ समस्यांवर तात्पुरते उपाय शोधत नाही, तर समस्याग्रस्त कुटुंबांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करते. विद्यार्थ्यांना शिक्षण, शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे प्रशिक्षण, महिलांना रोजगार व किचन गार्डन, पारंपरिक बियाण्यांचे संवर्धन, शाळांमध्ये परसबाग, पर्यावरणासाठी सीड बॉल्स आणि गावांमध्ये मूलभूत सुविधांचा विकास—या सर्व उपक्रमांचा अंतिम उद्देश एकच आहे : "स्वावलंबी व्यक्ती, सक्षम कुटुंब आणि आत्मनिर्भर गाव." आज ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाच्या योजनांसोबतच समाजाच्या सहभागाची गरज आहे. दीनदयाल प्रबोधिनीचे कार्य या दृष्टीने एक सकारात्मक आणि अनुकरणीय उदाहरण ठरते. निळोणा येथील या संस्थेच्या कार्याला भेट देताना ग्रामीण आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी सुरू असलेले विविध उपक्रम प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. संस्थेचे कार्य करणारे कार्यकर्ते, मार्गदर्शक, शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सहकार्य करणारे सर्व घटक यांचे योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे. शिक्षणातून परिवर्तन, शेतीतून समृद्धी, महिलांमधून स्वावलंबन, पर्यावरणातून समृद्ध गाव आणि संस्कारातून सक्षम समाज या विचारातून दीनदयाल प्रबोधिनीचा प्रवास पुढे सुरू आहे.

ही केवळ संस्था नाही; तर ग्रामीण समाजाच्या आत्मनिर्भरतेकडे नेणारी एक चळवळ आहे.

-संजय सिताराम डवरे, संचालक,
वत्सगुल्म कृषी विकास
प्रकल्प तोरणाळा, वाशिम

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी नामनिर्देशन प्रक्रिया आजपासून सुरू

## सर्वसाधारण उमेदवारांसाठी 10 हजार तर राखीवसाठी 5 हजार अनामत रक्कम

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** येत्या २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया मंगळवार, २९ सप्टेंबरपासून सुरू होईल. भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर आहे. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होईल आणि २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होईल. नामनिर्देशन प्रक्रिया पार पाडण्यासाठी विभागीय आयुक्त आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली तीन अधिकारी आणि सहा कर्मचाऱ्यांच्या पथकाची विभागीय आयुक्तालयात नियुक्ती करण्यात




आली आहे. निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याबरोबरच विभागात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज विनामूल्य उपलब्ध करून दिले जातील. अर्ज दाखल करताना, सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांना 10 हजाराची सुरक्षा ठेव जमा करावी लागेल, तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना 5 हजार जमा करावे लागतील. उमेदवार 29 सप्टेंबर ते 6 ऑक्टोबर या कालावधीत, सकाळी 11:00 ते दुपारी 2:00 या वेळेत नामनिर्देशन दाखल करू शकतात. 6 ऑक्टोबरनंतर नामनिर्देशन स्वीकारले जाणार नाहीत. नामनिर्देशनांची छाननी 7 ऑक्टोबर रोजी पूर्ण होईल आणि अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया 9 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाईल.

### अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूक तयारीला वेग

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी 33 हजार 964 शिक्षक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार प्राध्यापक आदिती ऋषिकेश पोहरे, भाजपातर्फे शेखर भोयर, संगीता शिंदे, शिवसेना शिंदे गटातर्फे किरण सरनाईक श्रीकांत देशपांडे, तर शिवसेना ठाकरे गटातर्फे दत्तात्रय लहाने शिक्षक आघाडी तर्फे सुरेश देवकर यांची नावे समोर येत आहेत. यापैकी शिवसेना शिंदे गटातर्फे किरण सरनाईक आणि श्रीकांत देशपांडे यांच्या तिकिटासाठी चढाओढ दिसून येत आहे तिकीट ना मिळाल्यास श्रीकांत देशपांडे यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचे सुतोवाच केले आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होईल असे मानले जात आहे

## जिल्ह्यात ट्रिगर 1 लागू; जिल्हाधिका-यांकडून आढावा

# चार दिवसांत पंचनामे पूर्ण करा

प्रतिनिधी २९ सप्टेंबर




**अकोला :** दुष्काळी परिस्थिती असलेल्या तालुक्यांत ट्रिगर १ (प्रथम कळ) नुसार विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. अकोला जिल्ह्यातील सातही तालुक्यांचा समावेश आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतक-यांच्या नुकसानाची तपशीलवार नोंद घेऊन चार दिवसांत पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राबवावयाच्या उपाययोजना, शासन निर्देश, सवलतींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महसूल उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार, जिल्हा कृषीविकास अधिकारी तुषार जाधव हे बैठक कक्षात, तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी व्हीसीद्वारे उपस्थित होते. पंचनामे तपशीलवार व सविस्तर करावेत. प्रत्येक नुकसानाची काळजीपूर्वक नोंद घ्यावी. सातही तालुक्यातील शेतीपिके, फळपीके नुकसानाचे क्षेत्रीय यंत्रणेमार्फत पंचनामे करून संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल अ, ब, क, ड सादर करावा. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, पोलीस पाटील, सरपंच, शेतकरी यांच्या उपस्थितीत तातडीने प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले. शेतक-याची माहिती बँक खात्याचे तपशील, फोन क्रमांक असे तपशीलही बिनचूकपणे नोंदवले गेल्याची खातरजमा करावी. सर्व तहसीलदारांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिका-यांकडे अहवाल सादर करावा व कृषी अधिक्षकांनी संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल वेळेत सादर करावा. रोज झालेल्या पंचनाम्यांची माहिती गुगलशीटवर नमूद करावी. याविषयी दिलेल्या सूचना व निर्देशांचे काटेकोर पालन व्हावे. हयगय किंवा विलंब होता कामा नये. सर्वांनी संवेदनशीलतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.दुष्काळग्रस्त भागासाठी लागू सवलतींचा आदेश जिल्हाधिका-यांनी जारी केला. जमीन महसूलात तूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजदेयकात सूट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयोअंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त काम सुरू करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे, शेतीवर आश्रित शेतकरी, मजूर आदी यांना अन्नधान्याची टंचाई होणार नाही याची व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे, पिण्याची पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे आदी कार्यवाही संबंधित विभागांनी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत.

## वातावरणातील बदलामुळे अकोल्यात आरोग्याच्या तक्रारीत वाढ!

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** शहरात बदलत्या वातावरणाचा परिणाम आता नागरिकांच्या आरोग्यावरही जाणवू लागला आहे. दिवसा वाढता उकाडा आणि रात्री जाणवणारा गारवा यामुळे विविध आजारांच्या तक्रारी वाढल्या असून, रुग्णालयांमध्येही रुग्णांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. अकोला शहरात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात मोठे बदल जाणवत आहेत. दिवसा प्रचंड तापमान आणि उकाडा, तर रात्री गारवा वाढत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः अस्थमाचा त्रास असलेल्या नागरिकांना या बदलत्या वातावरणाचा अधिक त्रास जाणवत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.ताप येणे, डोकेदुखी, अशक्तपणा यासह सर्दी-खोकला आणि व्हायरलच्या तक्रारी घेऊन रुग्ण उपचारासाठी येत आहेत. सध्या अनेक नागरिकांना व्हायरलचा त्रास होत असून, त्यांची रुग्णालयांमध्ये गर्दी वाढताना दिसत आहे. विशेष म्हणजे लहान मुलांमध्येही आजारांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे. बदलत्या वातावरणामुळे शरीरावर अचानक ताण येत असल्याने नागरिकांनी आरोग्याकडे दुर्लक्ष न करता आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ताप, डोकेदुखी, अशक्तपणा किंवा व्हायरलची लक्षणे जाणवल्यास स्वतःहून औषधोपचार करण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# मध्य रेल्वे करणार प्रवाशांची ओळख परेड

## तिकिटासोबतच दाखवावे लागणार आता ओळखपत्र

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** रेल्वे तिकिट असूनही आवश्यक मूळ ओळखपत्र जवळ नसल्यास प्रवाशांना कारवाईला सामोरे जावे लागू शकते. सवलतीची तिकिटे, विशेष आरक्षण कोटा आणि विविध पासच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी मध्य रेल्वे १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे. स्थानकांसह रेल्वेगाड्यांमध्येही तिकिटांची तपासणी केली जाणार आहे. एका तिकिटावर अनेक प्रवासी प्रवास करत असल्यास त्यापैकी किमान एका प्रवाशाकडे निर्धारित मूळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ते सादर करता आले नाही, तर त्या तिकिटावरील सर्व प्रवाशांना नियमानुसार विनातिकीट प्रवासी मानले जाऊ शकते. त्यामुळे प्रवास करताना आवश्यक मूळ ओळखपत्र सोबत ठेवणे गरजेचे आहे. सवलतीच्या दरात किंवा विशिष्ट आरक्षण कोट्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची पात्रता तपासली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक मूळ कागदपत्रे जवळ असणे बंधनकारक आहे. ई-पास आणि पीटीओवरून प्रवास करणाऱ्यांनीही मूळ ओळखपत्र सोबत ठेवावे. तसेच ई-पास किंवा पीटीओची निर्धारित प्रवास प्राधिकरणात देवाणघेवाण झाली आहे की नाही, याची तपासणी केली जाणार आहे.



### तिकिटांची सत्यताही तपासणार

विशेषतः अनारक्षित तिकिटांची सत्यता तपासली जाणार असून, गरजेनुसार तिकीट तपासणी कर्मचारी 'टीटीई ॲप'चा वापर करतील. बनावट तिकिटे, सवलत व आरक्षण सुविधेचा गैरवापर रोखण्यासह रेल्वेच्या महसुलाची गळती थांबविणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. मध्य रेल्वेने प्रवाशांना वैध तिकीट आणि आवश्यक कागदपत्रांसह प्रवास करण्याचे आवाहन केले आहे

## बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या आढळल्याने कारवाई

### 25 हजार रुपये दंड केला वसूल



प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** 29/09/2026 रोजी पूर्व झोन अंतर्गत प्रतिबंधित प्लास्टिक कारवाई दरम्यान सहाय्यक आयुक्त गणेश सहाने व स्वच्छता विभाग प्रमुख राजूरकर यांच्या उपस्थितीमध्ये कारवाई केली. सातव चौक ते गणेश स्वीट मार्ट, उमरी रोडवरील किरकोळ भाजी विक्रेता व फळ व्यवसायी यांची तपासणी केली. दरम्यान प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आले. संबंधितांकडून २५ हजार रुपये दंड आकारण्यात आला कारवाईदरम्यान पूर्व झोन चे स्वच्छता निरीक्षक व त्यांचे अधिनस्त सहकारी उपस्थित होते.

## 'वोट चोरी'च्या आरोपांवर काँग्रेस आक्रमक!

### मुख्य निवडणूक आयुक्तांचा जाळला पुतळा

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला.** काँग्रेस आता निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार आणि 'वोट चोरी'च्या आरोपांच्या विरोधात आक्रमक झाली आहे. आज महापालिकेसमोर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांचा पुतळा जाळून केंद्र सरकारवर मतचोरीचा आरोप केला.

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीणच्या वतीने आज सोमवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन निवडणूक प्रक्रियेतील भ्रष्टाचाराचा आरोप



करत 'वोट चोरी'च्या मुद्द्यावर करण्यात आले. काँग्रेसने या आंदोलनाच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरव्यवहारांविरोधात आपला तीव्र विरोध नोंदवला.

सोमवारी दुपारी अकोला येथील स्वराज्य भवनात काँग्रेस कार्यकर्ते एकत्र आले आणि त्यांनी महापालिकेवर मोर्चा काढला. या मोर्चामध्ये एका गाढवावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा पुतळा ठेवण्यात आला होता. मोर्चा महापालिकेवर आल्यानंतर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

## निर्माण मल्टीस्टेट, अकोला ची 15 वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** निरंतर ध्यास विकासाचा संस्थेच्या या घोषवाक्यानुसार सतत प्रगती करीत असलेल्या निर्माण मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. अकोला ची 15 वी वार्षिक आमसभा जानोरकर मंगल कार्यालय अकोला येथे दि.20.09.2026 ला पार पडली. सभेचे अध्यक्ष श्री गणेशराव देशमुख होते.

सुरुवातीला अहवाल वर्षात भारतातील थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, जवान, शिक्षण तज्ञ, सहकार क्षेत्रातील मान्यवर तसेच संस्थेचे सभासद, हितचिंतक जे पंचतत्वात विलिन झाले त्यांना श्रध्दांजली वाहन्यात आली. संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक गजानन खोटरे




यांनी आर्थिक वर्षाच्या अहवालाचे वाचन करुन संस्थेने कशी प्रगती केली याबाबत सविस्तर माहिती दिली. सन 2025-26 या आर्थिक वर्षाचे हिशेब पत्रके व अहवाल सभेसमोर सादर केला. सर्व सन्माननीय सभासदांच्या सहमतीने व विश्वासामुळे संस्थेने आर्थिक वर्षात चांगली कामगिरी केली. संस्थेच्या अहवाल वर्षात ठेवीमध्ये मागील वर्षापेक्षा रु.41.00 कोटीने वाढ होऊन ठेवी रु.157.70 कोटी झाल्या. तर कर्ज रु.110.44 कोटी होते. एकूण कर्जामध्ये सोने व ठेव तारण कर्ज रु.84.44 कोटी तर तारणी कर्ज रु.19.40 कोटी आहे. म्हणजेच एकूण कर्जामध्ये 94% सुरक्षित कर्ज आहे. त्यामुळे संस्थेचा एन.पी.ए.1% कमी तर नेट एन.पी.ए. 0% आहे. संस्थेच्या सर्व शाखा कोअर बँकींग प्रणाली अंतर्गत काम करीत असून सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व प्रकारच्या सुरक्षा प्रणालीचा वापर करीत आहे. संस्थेचे उपाध्यक्ष श्री के. जी. देशमुख व श्री व्ही.ए. देशमुख यांनी संस्थेवर आपण विश्वास दर्शवित आहात त्यामुळेच संस्था प्रगती करीत आहे याबाबत सर्व सभासदांचे आभार मानले. संस्थेचे ग्राहक मुरकुटे मॅडम कारंजा यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.डॉ. प्रशांत कृष्णराव देशमुख- प्राचार्य डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज, मलकापूर यांना प्रतिष्ठित साय रँक ग्लोबल रजिष्ट्री 2025 व्दारे जगातील अव्वल 5 शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाल्याबाबत, श्री बाळ काळणे सर्प मित्र, 79% दिव्यांग असूनही सर्पसेवा, वन्यजीव सेवा इत्यादी बाबत श्री मंगेश श्रीवास चित्रकला टिचर असून गरीब व होतकरु मुलांना विनाशुल्क प्रशिक्षण देतात. श्री संजय माणिकराव देशमुख - संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ, गत 42 वर्षापासून पत्रकारितेमध्ये समाजकार्य, पत्रकार संघटन कार्य, आरोग्य, शैक्षणिक, ग्रामविकास, मुद्रणक्षेत्र इत्यादी अग्रेसर, श्री गुणवंतराव जानोरकर सेवानिवृत्ती नंतर जानोरकर मंगल कार्यालय र दृष्टीकोन बाजूला ठेवून सामाजिक सेवेकरीता, आध्यात्मिक, योगा, देशप्रेम इत्यादी कार्यक्रमाकरीता मंगल कार्यालय अल्पदरात उपलब्ध करुन देवून समाजसेवा करीत असल्यामुळे श्री प्रतापराव देशमुख - निर्माण मल्टीस्टेट डाबकी रोड शाखेने सल्लगार यांची अकोला जिल्हा मराठा महासंघाचे उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबाबत सर्वांचा तर करण्यात आला.संस्थेचे अध्यक्ष गणेशराव देशमुख यांनी मनोगत व्यक्त करतांना संस्थेचे संचालक मंडळ कोणताही मोबदला न घेता निस्वार्थ सेवा देत असून संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचाही वाटा आहे. सूत्रसंचालन श्री शिवाजी काळे-विकास अधिकारी, दिप्ती देशमुख शाखाधिकारी यांनी केले.

# कुटुंब कल्याणच्या आकडेवारीला 'ब्रेक' का?

## टार्गेट किती, अंमलबजावणी किती? आरोग्य विभागाकडून मौन

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या आकडेवारीवरून आता प्रश्न उपस्थित झाले आहेत. कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट किती, प्रत्यक्षात किती शस्त्रक्रिया झाल्या आणि उद्दिष्टपूर्ती किती टक्के झाली, याची माहिती मागून आठवडा उलटला आहे. मात्र, अद्यापही ही मूलभूत आकडेवारी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे माहिती देण्यास एवढा विलंब का, असा सवाल उपस्थित होत आहे.

कुटुंब नियोजन हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी महिला आणि पुरुष नसबंदीच्या शस्त्रक्रियांसाठी आरोग्य विभागाला उद्दिष्ट दिले जाते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जनजागृती, लाभार्थी शोध आणि शस्त्रक्रियेची प्रक्रिया राबवली जाते.

मात्र, अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे या कार्यक्रमाची नेमकी प्रगती किती आहे, याची आकडेवारी मागून तब्बल एक आठवडा उलटूनही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे. नेमके उद्दिष्ट किती होते? प्रत्यक्षात किती शस्त्रक्रिया झाल्या? महिला आणि पुरुष नसबंदीची संख्या किती? तालुकानिहाय उद्दिष्टपूर्ती किती? तसेच मागील वर्षाच्या तुलनेत यंदाची कामगिरी कशी आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकृत आकडेवारीतून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.विशेष म्हणजे, उद्दिष्टपूर्ती झाली असेल तर आकडेवारी देण्यास विलंब का आणि उद्दिष्ट अपूर्ण असेल तर त्यामागची कारणे काय? असा सवाल आता उपस्थित होत आहे. त्यामुळे माहिती देण्यास झालेला विलंब नेमका प्रशासकीय प्रक्रियेमुळे आहे की आकडेवारी संकलनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही, याबाबत आरोग्य विभागाने स्पष्टता देणे गरजेचे आहे.एकीकडे शासनाकडून आरोग्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला जात असताना, कुटुंब कल्याणसारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमाची मूलभूत माहिती मिळण्यासाठी आठवडाभर प्रतीक्षा करावी लागत असल्याने विभागाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.आता कुटुंब नियोजनाच्या उद्दिष्टपूर्तीचे नेमके वास्तव काय? किती शस्त्रक्रिया झाल्या? किती उद्दिष्ट बाकी आहे? आणि आकडेवारी देण्यास विलंब का झाला? या प्रश्नांवर जिल्हा परिषद आरोग्य विभाग काय स्पष्टीकरण देतो, याकडे लक्ष लागले आहे.

## सोयाबीनचे दर वाढले आवक मात्र ठप्पच!

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अकोला:** कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनच्या दरात काहीशी सुधारणा झाली असली, तरी बाजारातील आवक मात्र अत्यल्प असल्याचे चित्र आहे. भाव वाढले, पण शेतकऱ्यांकडून सोयाबीनची विक्री अपेक्षेप्रमाणे होत नसल्याने बाजारातील आवक मंदावली आहे.

अकोला जिल्ह्यात सोयाबीनचा हंगाम सुरू असतानाच बाजारातील आवक आणि दराचे वेगवेगळे चित्र समोर आले आहे. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या दररोज सरासरी 60 ते 70 क्विंटल सोयाबीनची आवक होत आहे. मात्र, शनिवारी 27 सप्टेंबर रोजी बाजार समितीत केवळ 84 क्विंटल सोयाबीनची आवक झाली.दरम्यान, सोयाबीनला बाजारात चांगला भाव मिळताना दिसत आहे. शनिवारी सोयाबीनला कमाल 5 हजार 730 रुपये, किमान 5 हजार 330 रुपये, तर सरासरी 5 हजार 555 रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. त्यामुळे दरात सुधारणा झाली असली, तरी त्याचा परिणाम बाजारातील आवकेवर मात्र दिसून येत नाही.

यंदा सोयाबीनच्या उत्पादनावर हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असताना, शेतकऱ्यांकडून बाजारात सोयाबीनची आवक कमी प्रमाणात होत आहे. भाव वाढले, मात्र बाजारात सोयाबीन येत नसल्याने आवक कमी आणि दरात सुधारणा, असे सध्या बाजारातील चित्र आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
४
मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# मत चोरी करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्तांना सेवेतून बडतर्फ करून तात्काळ अटक करा

## शहर काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अमरावती:** देशातील लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता धुळीस मिळवून एसआयआर प्रणालीच्या माध्यमातून उघडपणे मत चोरी करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश्वर यांना तत्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक करावी, अशी आक्रमक मागणी अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. या गंभीर संदर्भात शहर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे जाऊन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महामहिम राष्ट्रपतींकडे मागण्यांचे निवेदन सादर केले.



या निवेदनाद्वारे काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या संशयास्पद आणि पक्षपाती कारभारावर कडाडून टीका केली. संविधानाने दिलेल्या स्वायत्ततेचा गैरवापर करून निवडणूक आयोग आज सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. डिजिटल यंत्रणा आणि एसआयआरच्या माध्यमातून जनतेच्या मतांवर दरोडा टाकण्याचे काम उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू असून, हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आणि संविधानाचा थेट अवमान करणारे कृत्य असल्याचा थेट आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला. निवेदन सादर करताना काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत म्हटले की, देशातील निवडणुका पारदर्शक, खुल्या आणि निःपक्षपाती वातावरणात घेणे ही निवडणूक आयोगाची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र, जबाबदार पदावर बसलेले मुख्य निवडणूक आयुक्त स्वतः मत चोरीच्या या षडयंत्रात सामील असल्याचा संशय बळावला आहे. अशा भ्रष्ट आणि लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या अधिकाऱ्याला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अथवा कायदेशीर अधिकार राहिलेला नसून, त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

काँग्रेस शिष्टमंडळाने स्पष्ट इशारा दिला की, जनतेच्या मतदानाचा हक्क आणि लोकशाही व्यवस्था वाचवण्यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरून शेवटपर्यंत संघर्ष करेल. संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई झाली नाही, तर अमरावती शहरासह संपूर्ण जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल असा इशारा जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदनात देण्यात आला. यावेळी - खासदार बळवंत वानखडे (अमरावती लोकसभा) , ॲड. यशोमतीताई ठाकूर (माजी मंत्री ) , सुनील देशमुख (माजी मंत्री ) , विलास इंगोले ( विरोधी पक्षनेते मनपा ) , मिलींद चिमोटे ( माजी महापौर ) , बबलूभाऊ शेखावत ( शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी अमरावती शहर ) , भैय्यासाहेब पवार, सुरेशभाऊ रतावा, अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक, विविध आघाड्यांचे प्रमुख आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होते.

# राजापेठ पोलीसांनी आरोपीकडून प्राणघातक शस्त्र केले जप्त

प्रतिनिधी २९ सप्टेंबर



**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी आरोपी कडुन प्राणघातक शस्त्र जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरणाची हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी पोहेकॉ शशिकांत शेळके आज दि. २८/०९/२०२६ रोजी १२.०० वा. पासुन आम्ही व सोवत इतर कर्मचारी असे पो.स्टे हददीत पेनोलींग करीत असतांना दिनांक २८.०९.२०२६ चे १.३० वा. गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की, एक इसम हिन्दु स्मशान भुमी परीसरात रोड, अमरावती येथे प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुन ते इसम येणा-या जाणा-या लोकांच्या मनामध्ये दहशत पसरवीत आहे. अशा खात्रीलायक माहीती वरून आम्ही स्टॉफ सह हिन्दु स्मशान भुमी परीसरात रोड, अमरावती रोडवर जावुन पाहणी केली असता तेथे एक इसम हातामध्ये शस्त्र घेवुन दहशत पसरवीतांना दिसुन आल्याने त्यांचे कृत्य सोबतच्या पंचांचे निदर्शनास आणुन नमुद इसमांना पो स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यांना जप्ती पंचनामातील पंचां समक्ष नाव गाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव आरोपी नामे सचिन साहेबराव लोखंडे, वय २९ वर्षे, रा. मारोती नगर ड्रीमपार्क आकोली रोड, अमरावती असे सांगीतले वरून नमुद आरोपीचे कडुन एक तलवार लाल रंगाचे टेप लावलेले फुस्टाचे कवर ज्यात एक लोखंडी पात्याची धारदार तलवार जिची पात्याची लांबी २५ इंच, मुठेची लांबी ५ इंच, पात्याची रूदी ३ इंच, संपुर्ण तलवारची लांबी ३० इंच असलेली जीची किमंत अं २००० रुचा माल पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला. वरून नमुद इमस हे प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुन मिळुन आले नमुद इसमांचे हे कृत्य कलम ४/२५ आर्म ॲक्ट, सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा होत असल्याने माझी त्याचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

सदर कार्यवाही दरम्याण आरोपी कडुन एक लोखंडी धारदार तलवार ज्याची एकुण लांबी ३० इच, पात्याची लांबी २५ इंच व मुठची लांबी ५ इच तसेच चात्याची रूदी ३ इच असलेली ज्याच्या एका बाजुवर निमुळते धारदार असलेला व ज्याची अं कि एकुण २००० रू चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

# पार्टलवर नोंदणी केलेल्या महिलांना 2 ऑक्टोबरनंतर मिळणार प्रमाणपत्र

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**दर्यापूर :** राज्याने महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टिने 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' लागू केला आहे. त्याअंतर्गत पात्र महिलांना शेतकरी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या माध्यमातून त्यांना अधिकृतपणे महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळणार आहे. तसेच शासनाच्या विविध कृषी योजना, कर्ज, विमा, अनुदाने, प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शनाचा लाभ सुलभपणे मिळू शकणार आहे. या प्रक्रियेत अमरावती जिल्हा राज्यात दुसरा अव्वल राहिला आहे. अमरावती जिल्ह्यात दर्यापूर तालुक्यात 7750 महिला शेतकऱ्यांनी शेतकरी प्रमाणपत्र मिळविले आहे. इतर तालुक्याच्या तुलनेत हा आकडा सर्वाधिक आहे.

शेतीमध्ये काम करणाऱ्या महिला, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिकापालन, भाजीपाला फळबाग लागवड व इतर शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. अशा पात्र महिलांनी महिला शेतकरी पोर्टलवर आवश्यक माहिती भरून ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे.

**२ ऑक्टोबरला विशेष ग्रामसभा**

ज्या महिला स्वतः शेतकरी आहेत, त्यामधून शेतकरी प्रमाणपत्र प्राप्त करून घेतात. पोर्टलवर अर्ज केलेल्या महिलांना २ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये पात्रता तपासून त्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज डगे यांनी दिली.

**काय आहे 'महिला शेतकरी प्रमाणपत्र'?**

या योजनेत ज्या महिलेकडे शेतजमीन नाही अशा महिलांनाही सातबारा नावावर नसला तरी महिला शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. यामध्ये शेतामध्ये प्रत्यक्ष श्रम करणाऱ्या या कुटुंबातील महिलांना हे प्रमाणपत्र मिळणार आहे., यामध्ये पीक लागवड, शेतमजुरी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, रेशीम उत्पादन व वनौपज संकलन करणाऱ्या महिला पात्र ठरणार आहेत.

# 'खाली दिमाग सैतान का घर'; भाजप खासदार डॉ. अनिल बोंडेंची राहुल गांधींवर जहरी टीका

प्रतिनिधी २९ सप्टेंबर



**अमरावती:** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यावरून आक्रमक होतं भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. "खाली दिमाग सैतान का घर" असा टोला लगावत बोंडेंनी राहुल गांधी यांची तुलना थेट 'सैतानाशी' केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. अनिल बोंडे म्हणाले, "राहुल गांधी यांना भारतातील शांतता आणि विकास अजिबात सहन होत नाही. सातत्याने होणाऱ्या निवडणुकांमध्ये पराभव होत असल्याने आणि अपयश झाकण्यासाठी ते केंद्रीय निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि इतर घटनात्मक संस्थांवर बिनबुडबुडे आरोप करत आहेत. निवडणुका जिंकता येत नाहीत, म्हणून घटनात्मक संस्थांवर टीका करून लोकांचा विश्वास उडवण्याचा हा प्रयत्न असल्याचे बोंडे यांनी नमूद केले. पत्रकार परिषदेला, भाजप शहर

जिल्हाध्यक्ष डॉ.नितीन धांडे, भाजप नेते रवींद्र खांडेकर, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती तुषार भारतीय, माजी महापौर चेतन गावंडे, किरण पातुरकर, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी उपस्थित होते.

राहुल गांधींवर निशाणा साधताना बोंडे म्हणाले, "राहुल गांधींच्या डोक्यात असलेला हा सैतान देशात अंतर्गत कलह आणि अशांतता निर्माण करू पाहत आहे. देशातील घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास उडावा आणि देश मागे पडावा, हाच यामागील मुख्य उद्देश आहे. हा सैतान देशाला डुबवण्याचा आणि अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले.

**भाजपकडून राहुल गांधींना सडेतोड प्रत्युत्तर**

राहुल गांधींकडून निवडणूक आयोगावर आणि ईव्हीएम (EVM) प्रणालीवर होणाऱ्या आरोपांना भाजप खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी जोरदार काउंटर करत खालील मुद्दे उपस्थित केले.

अयशाचे खापर संस्थांवर काँग्रेसला एकामागून एक निवडणुकांत पराभवाचा सामना करावा लागत आहे. स्वतःचे राजकीय अपयश आणि संघटनाव्यवस्था लपवण्यासाठीच राहुल गांधी निवडणूक आयोगाला लक्ष्य करत आहेत.

काँग्रेस जेव्हा कर्नाटक, तेलंगणा किंवा हिमाचल प्रदेशात निवडणूक जिंकते, तेव्हा निवडणूक आयोग आणि ईव्हीएम पूर्णपणे निष्पक्ष असतात; मात्र भाजपचा विजय होताच त्याच संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, ही काँग्रेसची दुटप्पी भूमिका आहे.

# काँग्रेस नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या निवासस्थानावरून ड्रोन द्वारे छायाचित्रण

## गाडगे नगर ठाण्यात तक्रार

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अमरावती :** अमरावती शहरातील गणेडिवाल लेआउट मधील यशोमती ठाकूर यांच्या घरावरून निवासस्थानवरून ड्रोनचे ड्रोन द्वारे घिरट्या घातल्याने खळबळ उडाली आहे.



यशोमती ठाकूर यांची अमरावतीच्या गाडगे नगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली.

माझ्या जीवितीला धोका- यशोमती ठाकूर यांची प्रतिक्रिया दिली.

ड्रोन द्वारे निवासस्थानाचे छायाचित्रण करून माझा घातपात होण्याची शक्यता माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा आरोप आहे.

# नागपूरीगेट हद्दीत 35 गोवंश व ट्रक असा 17 लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अमरावती:** नागपूरीगेट हद्दीत ४,८८,०००/-रु. किंमतीचे ३५ गोवंश व गोवंश वाहून नेणारा आयशर ट्रक असा एकूण १७,००,०००/-रु. चा मुद्देमाल

जप्त केला. एका आरोपीला ताब्यात घेतले. गुन्हे शाखा, युनिट कं. ०१ ने कामगिरी केली.

२८/०९/२०२६ रोजी गुन्हे शाखा, अमरावतीला माहिती मिळाली की, लालखडी रोड टावर लाईन बाबा पॅलेसचे पुढे मोकळ्या जागेत एक विटकरी रंगाचा आयशर क्रमांक MH40-CM-3230 उभा असून त्यामध्ये कत्तलीकरीता आणलेले गोवंश डांबून ठेवले आहे. अशा खात्रीशीर माहिती वरुन गुन्हे शाखा, अमरावती शहरचे अधिकारी व अंमलदार माहितीप्रमाणे लालखडी रोड, बाबा पॅलेसचे समोरील मोकळ्या जागेत गेले असता आयशर उभा होता. तेथे दोन इसम हजर होते व ते आयशर ट्रकमधून कत्तलीसाठी आणलेले गोवंश खाली उतरवत होते.

- वरुन अमरावती महानगर पालीका येथील पशु वैदयकीय अधिकारी व त्यांचा स्टाफ यांना पाचारण करण्यात आले. पशु वैदयकीय अधिकारी यांचेसह जवळ नावून पाहाणी केली असता गोवंश यांना आखूड दोराने अमानुषरित्या बांधून व डांबून आणले होते. त्यातील ३ गोवंश या मृत असल्याचे पशुवैदयकीय अधिकारी यांनी घोषीत केले तसेच इतर ३२ गोवंश जखमी अवस्थेत दिसले. २८ गायी व ७ गोरे असे एकूण ३५ गोवंश जनावरे किं. अंदाजे ४,८८,०००/-रु. ची अमानुषपणे व निदर्यतेने एकाच दोराला बांधून, चारापाणी विना डांबून आणलेली



मिळून आली. सदर ट्रकजवळ उभ्या असलेल्या एका इसमांस जनावरांचे मालकी बाबत विचारणा केली असता त्यानी सदर गोवंश जनावरे यातील आरोपी क्रमांक २ यांचे मालकीचे आहे असे सांगीतले मालकी हक्का बाबत कुठलेही कागदपत्रे सादर न केल्याने पंचासमक्ष मुद्देमाल जप्त करण्यात आला. मिळून आलेली ३२ गोवंश जनावरे देखभाल व संरक्षणाच्या दृष्टीने गोरक्षण संस्थान, दस्तुरनगर, अमरावती येथे पाठविण्यात आली.

आरोपी अब्दुल अजहर अब्दुल नझीर, वय ३० वर्षे, रा. बिस्मिल्ला नगर, अमरावती, मोहम्मद मुसिर मोहम्मद शफी, रा. लालखडी, अमरावती (फरार), आयशर ट्रक क्रमांक MH40-CM-3230 चा चालक राशीद. रा. नागपूर फरार आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, प्रांजली सोनावणे,पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) निलेश ब्राम्हणे यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर, सपोनि मनीष वाकोडे, दशरथ आडे, फिरोज खान, पोहवा संभाजी केन्द्रे, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे.कॉ. नाझीमउददीन सैयद, पोहवा संजय भारसाकळे, पो. ना. सचिन भोयर, पोलीस अंमलदार रंजित गावंडे, नरेश मोहरिल, सागर ठाकरे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक प्रभात पोकळे, चेतन शर्मा, गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केली आहे.

# राणीगाव सर्कल मधील शेतकऱ्याचे चक्रीवादळामुळे मोठे नुकसान

## आमदार केवलराम काळे यांनी केली पाहणी

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**धरणी :** तालुक्यात शुक्रवारी संध्याकाळी सुसर्दा आणि नागझिरा व दाबका, नारडु, बारातांडा,सह आसपासच्या ग्रामीण भागात झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे, वादळामुळे आणि पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. अचानक आलेल्या

चक्रीवादळासारख्या हवामानामुळे शेतातील उभ्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे वृत्त समोर येत आहे. परिसरातील विविध गावांमधून पिकांचे नुकसान आणि उन्मळून पडलेल्या झाडांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर दिसू लागले आहेत. वृत्तानुसार, संध्याकाळी हवामानात अचानक झालेल्या या बदलामुळे हे घडले. सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळ सुरू झाले. त्यानंतर लगेचच मुसळधार



पाऊसही सुरू झाला.

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी विजेचे खांबही पडल्याचे वृत्त आहे. यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या मते, वादळाचा सर्वाधिक परिणाम शेतात उभ्या असलेल्या खरीप पिकांवर होईल. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पिके जमिनीवर पडली असून, काही शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे वृत्त आहे.या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे, हवामान आणि शेतीसंबंधित आव्हानांशी आधीच झगडणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, रात्रंदिवस मेहनत करून तयार केलेली पिके अचानक आलेल्या जोरदार वादळामुळे खराब झाली आहेत. हे वादळ शेतकऱ्यांसाठी एक आपत्तीच ठरले आहे.या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना येत्या काळात आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. सुसर्दा, नागझिरा, डबका यांसारख्या बाधित गावांमध्ये पंचनामा आणि इतर जमिनीच्या नोंदी तात्काळ तयार कराव्यात, अशी विनंती शेतकऱ्यांनी प्रशासनाला केली आहे.त्यांनी पिकांच्या सर्वेक्षणाची मागणी केली आहे.

# दुबार लाभार्थी व निष्क्रिय शिधापत्रिकांवर कारवाई

**अमरावती:** केंद्र शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) सुधारणा आदेश, २०२५ मधील तरतुदीनुसार लाभार्थी शिधापत्रिकांचे नियमित अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्ह्यातील निष्क्रिय शिधापत्रिका तसेच दुबार (डुप्लिकेट) लाभार्थ्यांवर आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे ई-केवायसी विहित कालावधीत पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रज्वल पाथरे यांनी केले आहे. सलग सहा महिन्यांच्या कालावधीत अन्नधान्याची उचल न झालेल्या शिधापत्रिकांची प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेला आढावा घेवून अशा शिधापत्रिका त्यानंतरच्या महिन्यातील १ तारखेला स्वयंचलितपणे निष्क्रिय (ऑटो डिॲक्टीव्हेट) करण्यात येणार आहे. निष्क्रिय शिधापत्रिका राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम (एनएफएसए) प्रणालीमध्ये दिसत राहतील मात्र, संबंधित शिधापत्रिकेवरील अन्नधान्य उचलण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. अशा शिधापत्रिकांमुळे लाभार्थी यादीतील रिक्त जागा निर्माण होणार नाही. संबंधित शिधापत्रिकाधारकांना सूचना देऊन कुटुंबातील सर्व सदस्यांचे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात येणार आहे. या कालावधीत ई-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित शिधापत्रिका राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत कार्यक्षमतेतून वगळण्यात येणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. मध्यवर्ती भांडार (सेंट्रल रिपोसटरी) मध्ये उपलब्ध नोंदींच्या आधारे आधार बेस ओळखीद्वारे आढळून आलेल्या डुप्लिकेट लाभार्थ्यांना निष्क्रिय करण्यात येणार आहे.

# चहाच्या टपरीपासून कोलंबिया विद्यापीठापर्यंत विकास तातड यांचा प्रेरणादायी प्रवास

प्रतिनिधी २९ सप्टेंबर

**अमरावती:** समाज कल्याण विभागाच्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती' योजनेने घडविलेल्या विकास तातड यांचा 'चहाच्या टपरीपासून कोलंबिया विद्यापीठापर्यंत'चा प्रवास अमरावतीतील युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शासकीय योजनेच्या लाभातून घडलेल्या या प्रवासासाठी 'आशीर्वादाचा दिवा' उपक्रमांतर्गत विकास तातड यांची भेट घेवून समाज कल्याण विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिवा प्रज्वलीत केला.

'सेवा संकल्प अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'आशीर्वादाचा दिवा' या उपक्रमांतर्गत समाज कल्याण विभागाच्या योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दिवा प्रज्वलित करणे व लाभार्थ्यांच्या भेटी घेणे हा



कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत अमरावतीच्या केवल कॉलनी येथील रहिवासी असलेले समाज कल्याण विभागाच्या राजर्षी शाहु महाराज परदेश शिष्यवृत्तीचे लाभार्थी विकास तातड यांच्या निवासस्थानी समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली.

या भेटी दरम्यान, विकास तातड यांनी आपल्या संघर्षमय शैक्षणिक प्रवासाची व सामाजिक कार्यातील वाटचालीची माहिती दिली. त्यांच्या वडिलांची छोटीशी चहाची टपरी होती. वडिलांना कामात मदत करतानाच त्यांनी शालेय शिक्षणापासून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची जिद्द कायम ठेवत त्यांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईतील टाटा सामाजिक विज्ञान संस्थान (टीआयएसएस) येथे प्रवेश घेतला. तिथे त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. दरम्यान, त्यांचा संशोधन निबंध अमेरिकेतील मँचेस्टर विद्यापीठात येथे निवडला गेला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135